MHGA040000062018



नि.मा.फौ.मा.क.१/२०१८
सरकार -वि-राकेश
(न्यायनिर्णय नि.क.२९)

दाखल दिनांक : ०३.०१.२०१८
नोंदणी दिनांक : ०३.०१.२०१८
निकाल दिनांक : ०२.११.२०१८
कालावधी :०० व —०९ म —३० दि

**निशाणी क्र. २९**

**न्यायालय विद्यमान न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी ) आरमोरी, जिल्हा — गडचिरोली**

( पिठासीन अधिकारी .. संजय एच. अटकारे )

**नियमित फौजदारी खटला क्र.०१/२०१८**

**CNR-MHGA04-000006-2018**

महाराष्ट्र शासन द्वारे .... **फिर्यादी**
पोलीस ठाणे अधिकारी, आरमोरी
जिल्हा : गडचिरोली

— वि रु ध्द —

**राकेश विश्वनाथ बोगा**
वय २६ वर्ष, धंदा — मजुरी/चालक,
राहणार — भगतसिंग चौक, आरमोरी,
तालुका — आरमोरी, जिल्हा — गडचिरोली .... **आरोपी**

भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यांकरीता

श्री. एस.एन.रासेकर, विद्वान सहा. शासकीय अभियोक्ता फिर्यादी पक्षातर्फे
श्री. सी.एल.दरेकर विद्वान विधिज्ञ आरोपीकरीता.

## न्या य नि र्ण य

( आज दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१८ रोजी घोषीत )

१) आरोपीविरुध्द कलम ३७९ भारतीय दंड संहिता अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांकरीता सदर प्रकरण चालविण्यात आले.

२) अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की,

फिर्यादी सुमर्थ सुखदेव सोरते राह. मोहटोला, पो. सिर्सी, ता. आरमोरी, जि.गडचिरोली यांनी दि. १५.१.२०१६ रोजी त्यांची मोटरसायकल बजाज प्लॉटीना कंपनीची क्र. एम.३३/एल—७३३९ ही चोरी गेल्याबाबतची फिर्याद दाखल केली.

३) दि. १४.११.२०१७ रोजी रात्री ९.०० वा. येणेप्रमाणे त्यांचे घराचे अंगणात सदरची मोटरसायकल हॅन्डलॉक करुन चाबी स्वत:कडे ठेवुन झोपले होते. दुस—या दिवशी सकाळी ६.०० वा. चे दरम्यान उठुन गाडी बघितली असता गाडी दिसली नाही. सदरचे वाहनाबाबत आजुबाजुच्या लोकांना विचारणा केली असता तसेच आजुबाजुचे गावात शोध घेतला असता मिळुन आली नाही. सदरची मोटरसायकल फिर्यादीला गावात न मिळुन आल्याने नि.क्र.२५ नुसार तोंडी रिपोर्ट दाखल केली. त्याचे तोंडी रिपोर्टवरुन अप.क्र.२९/२०१७ कलम ३७९ भां.दं.वी. चा गुन्हा अनोळखी ईसमाविरुध्द नि.क्र.२६ नुसार नोंदविला. सदरच्या गुन्हयाचा तपास अभियोजन पक्षाचे सा.क्र.६ मोरेश्वर गौरकर यांचेकडे देण्यात आला. त्यांनी घटनास्थळावर जावुन घटनास्थळ पंचनामा तयार केला. दि. १९.११.२०१७ रोजी आरोपी राकेश बोगा हा सदरची मोटारसायकल घेवुन वडसाकडुन आरमोरीकडे येतांना राजु कुमरे आणि आशिक किरंगे यांना दिसला त्यांच्या माहितीवरुन आरोपीस अटक केली आणि त्यांनी नि.क्र.८ व ९ नुसार निवेदन पंचनामा तयार केला आरोपीने लपवुन ठेवलेली मोटारसाकल पोलीसांना दाखविली. त्यांनतर त्यांनी साक्षीदारांचे बयाणे नोंदविली. आरोपीविरुद भरपुर पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

४) मी नि.क्र.२ नुसार आरोपीविरुद्ध दोषारोप लावले. ते त्यास वाचून व समजावून सांगितले. आरोपीची जबानी नि.क्र.३ नुसार नोंदविली असून त्याने गुन्हा नाकबुल करुन प्रकरण चालविण्याची विनंती केली.

५) त्यानंतर अभियोग पक्षाने त्यांची केस सिद्ध करण्याकरिता एकूण सात साक्षीदारांचे बयान नोंदविले आणि नि.क्र.२७ नुसार पुरसिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. मी नि.क्र.२८ नुसार आरोपीचे फौ.प्र.सं.चे कलम ३१३ नुसार बयान नोंदविले. आरोपीने घेतलेल्या उलटतपासावरुन आणि फौ.प्र.सं.च्या कलम ३१३ चे अवलोकन केले असता आरोपीचा बचाव पूर्णपणे नकारार्थी आहे.

६) अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एन. रासेकर आणि आरोपीतर्फे अभियोक्ता श्री.सी.एल. दरेकर यांचा युक्तीवाद ऐकला.

७) खालील मुद्दे माझे निर्धारणा करीता उद्भवतात, त्यांना मी सकारण माझे निष्कर्ष देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपीने दि. १४.११.२०१७ ते १५.११.२०१७ २१.००ते १६.०० वा. चे दरम्यान मौजा मोहटोला, ता.आरमोरी, जिल्हा— गडचिरोली येथे फिर्यादीच्या घरुन बजाज प्लॉटीना कंपनीची क्र. एम.३३/एल—७३३९ किंमत रु.२५,०००/— या वाहनाची चोरी केली ? | **नकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ व २ करिता

८) अभियोग पक्षाने समर्थ सोरते (अ.सा.क्र.७) हे फिर्यादी असुन त्यांच्या बयाणाचे अवलोकन केले असता त्यांची गाडी कोणी चोरुन नेली हे त्यास माहित नाही. रामदास गुणु बोगा (अ.सा.क्र.३), राजु संपत कुंभरे (अ.

सा.क्र.४), आशिक रोहिदास किरंगे (अ.सा.क्र.५) हे अभियोग पक्षाला कोणत्याही प्रकारे मदत करीत नाहीत.

९) अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे राजु संपत कुंभरे (अ.सा.क्र.४) आणि आशिक रोहिदास किरंगे (अ.सा.क्र.५) यांनी आरोपी हा त्यांना सदरची मोटरसाकल घेवुन जातांना दिसला असे कथन आहे. परंतु त्यांचे बयाणाचे अवलोकन केले असता ते अभियोजन पक्षाला कोणतीही मदत करीत नाही. त्यांना घटनेबाबत काहीही माहिती नाही. त्यांचे पोलीसांनी बयाण नोंदविले नाही असे कथन केले.

१०) अभियोजन पक्षाने नि.क्र.८ आणि ९ नुसार निवेदन पंचनामा नोंदविला असुन त्यानुसार साक्षीदार दिलीप महागुजी कुकूळकर (अ.सा.क्र.१), विजय रामदास येनुगवार (अ.सा.क्र.२) याचे बयाण नोंदविले आहे. अभियोगपक्षाचे कथनानुसार आरोपीने सदरची मोटरसायकल ही आरमोरी—वडसा रोडवरुन कासवी गावाकडे जाणा—या रोडकडे अंदाजे १०० मिटरवर रोडच्या कडेला लागुन असलेल्या झुडपी जंगलात एका बांबुच्या झुडपाच्या जवळ झाडाच्या फांदयांनी झाकुन ठेवलेल्या स्थितीत मिळाली असे कथन केलेले आहे. याउलट दिलीप कुकूळकर (अ.सा.क्र.१) दिली यांनी असे कथन केले आहे की, कासवी रोडकडुन आष्टा रोडकडे त्यांना घेवुन गेले आणि आरोपीने लपवुन ठेवलेली गाडी दाखविली. विजय येनुगवार (अ.सा.क्र.२) यांनी असे कथन केले आहे की ती गाडी कासवी फाटयामध्ये एका झुडपामध्ये ठेवली होती. वरील अभियोगपक्षाचे सा.क्र.१ व २ यांच्या बयाणाचे अवलोकन केले असता, हे परस्पर विरोधी आहे त्यांच्यात एकवाक्यता नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपीच्या सांगण्यानुसार निवदेन पंचनामा केला किंवा काय याबाबत दाट संशय निर्माण होतो. निवेदन पंचनामा हा अभियोजन पक्षाने भारतीय पुरावा कायदयानुसार सिध्द केला नाही. अश्यापरिस्थीतीत आरोपीने सदरची मोटारसायकल फिर्यादीचे अंगणातुन चोरुन नेली, असे संशयापलीकडे सिध्द

करण्यास अभियोगपक्ष सपशेल अपयशी ठरला आहे. करीता मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नाकरार्थी नोंदवित असुन मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे : —

## आ दे श

१) **आरोपी राकेश विश्वनाथ बोगा** यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांतून कलम २४८(१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अंतर्गत दोषमुक्त करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) मामल्यात जप्त बजाज प्लॅटीना कंपनीची मोटारसायकल क्र. एम. ३३/एल—७३३९ हि या अगोदर सुप्रतनाम्यावर सोडण्यात आल्याने सदरचे सुप्रतनामा बंधपत्र हे अपीलाच्या कालखंडानंतर रद्द करण्यात यावे.

४) आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये, पुर्तता करावी.

५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आले.

स्वा/—
(संजय एच. अटकारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
आ र मो री
MHGA04-2567

स्थळ : आरमोरी
दिनांक: ०२/११/२०१८